## जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, जिल्हा न्यायालय, गोंदिया

### 'विधी स्वयंसेवक/अधिकार मित्र' पदासाठी अर्ज केलेल्या उमेदवारांसाठी मुलाखतीबाबत महत्वाची सूचना

उपरोक्त संदर्भांकित विषयांच्या अनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, गोंदिया तसेच सर्व तालुका विधी सेवा समिती अंतर्गत सन २०२५—२०२६ या वर्षाकरिता ''विधी स्वयंसेवक/अधिकार मित्र'' (Para Legal Volunteer) नियुक्तीकरिता दिनांक १६/१२/२०२४ पर्यंत पात्र उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात आलेले होते. त्या अनुषंगाने दिनांक ०७/०१/२०२५ रोजी सर्व **तालुका विधी सेवा समिती तिरोडा/आमगाव/देवरी/अर्जुनी मोरगाव/सड़क अर्जुनीकडे** विधी स्वयंसेवक/अधिकार मित्र (Para Legal Volunteers) करीता अर्ज केलेल्या उमेदवारांची मुलाखत दुपारी ०२:१५ व सायंकाळी ५:३० वाजता संबंधीत तालुका न्यायालयात आयोजित केली आहे.

तसेच ०८/०१/२०२५ रोजी जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, गोंदिया यांच्याकडे विधी स्वयंसेवक/अधिकार मित्र (Para Legal Volunteers) करिता अर्ज केलेल्या उमेदवारांची मुलाखत दुपारी ०२:१५ व सायंकाळी ०५:३० वाजता मा. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश व अध्यक्ष, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, गोंदिया यांचे निजी दालनात आयोजित केली आहे.

जे उमेदवार अनुपस्थित राहतील त्यांचे अर्ज/उमेदवारी रद्द करण्यात येईल. सर्व उमेदवारांनी **मुलाखतीकरिता येतांना दुपारी १२:०० वाजता जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, गोंदिया येथे वा त्यांचे संबंधीत तालुका न्यायालयात** सादर केलेल्या प्रमाणपत्रांच्या साक्षांकीत प्रती व त्यांचे मूळ प्रमाणपत्रे सादर करणे आवश्यक आहे. मुख्यत:

१) जन्म तारखेचा दाखला किंवा पुरावा (शाळा सोडल्याचा दाखला/जन्म दाखला/माध्यमिक शाळा प्रमाणपत्र)

२) पात्रता दर्शविणारी परीक्षा उत्तीर्ण झाल्याचे व इतर पात्रता दर्शविणारे प्रमाणपत्र/ गुणपत्रिका.

३) विधी स्वयंसेवक/अधिकार मित्र म्हणून काम केलेल्या किंवा प्रशिक्षण घेतल्यास अनुभव प्रमाणपत्र.

४) विवाहित महिला उमेदवाराच्या बाबतीत, जर तिने लग्नानंतर आपले नाव बदलले असेल तर नाव बदलण्या संदर्भातील कागदपत्रे .

५) जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाने मागितल्यास इतर कागदपत्रे.

सचिव,
जिल्हा विधी सेवा प्राधिकरण,
गोंदिया

दिनांक: ०४/०१/२०२५